**महाराष्ट्र शासन - जलसंपदा विभाग**
**समन्वय समिती**
**गट (ब) अराजपत्रित व गट-क सरळसेवा भरती**

---

**जा.क्र.दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२/ ५४१ / सन २०२४** **दि.: ०९ .१०.२०२४**

# प्रसिध्दीपत्रक

जलसंपदा विभागाच्या गट ब (अराजपत्रित) व गट क सरळसेवा भरतीप्रक्रिया सन २०२३ अन्वये सर्व परीमंडळ स्तरावरील निवड व प्रतिक्षा यादया जलसंपदा विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. **सदर प्रतिक्षायादया शासन निर्णय दिनांक ०४.०५.२०२२ मधील तरतुदीनुसार निवड यादया जाहिर केलेपासुन १ वर्ष मुदतीसाठी वैध राहतील.** सदर निवड झालेल्या उमेदवारांच्या शिफारशी समन्वय समितीमार्फत सर्व परीमंडळ कार्यालयास देण्यात आलेल्या आहेत. तसेच त्या त्या परीमंडळ स्तरावरून मंडळस्तरावर शिफारशी देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने मंडळ स्तरावर प्रचलित शासन नियमानुसार कार्यवाही करून नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर मंडळ स्तरावर करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये काही उमेदवार कागदपत्र तपासणीसाठी मंडळ स्तरावर अनुपस्थित होते. तसेच उर्वरीत उमदेवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. अशावेळी जे उमेदवार संबंधीत मंडळ स्तरावर कागदपत्रास उपस्थित नव्हते यांची परीमंडळ स्तरावरून शिफारस रदद करण्याबाबतची कार्यवाही चालु आहे. तसेच मंडळ स्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचा कालावधी संपुष्ठात आला असल्यास त्यांचे नियुक्तीचे आदेश रदद करण्यातबाबत संबंधित कार्यालयास कळविण्यात आले आहे. तसेच प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन पदवीधर या समांतर आरक्षणानुसार नियुक्त झालेल्या बऱ्याच उमेदवारांचे प्रमाणपत्राची वैधता अदयाप प्राप्त झालेली नाही. त्याबाबत संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा चालु असुन, संबंधित नियुक्तीचे आदेश अदयापपर्यंत देण्यात आलेले नाहीत. तसेच दिव्यांग प्रवर्गातील देखील उमेदवारांच्या प्रमाणपत्र तपासणी होवुन प्राप्त झालेली नाहीत. प्रचलित शासन निर्णयानुसार दिव्यांग व अनाथ उमेदवारांना ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्या प्रवर्गातील सर्वसाधारण जागांवर त्यांची नियुक्ती करावी लागते. जी काही दिव्यांग प्रमाणपत्रे तपासुन प्राप्त आहेत त्यातील काही उमेदवारांची प्रमाणपत्रे अवैध ठरली आहेत, तसेच अदयाप अहवाल प्राप्त, नसल्यांमध्ये देखील अवैध दिव्यांग उमेदवार असु शकतात. जो पर्यत दिव्यांग व अनाथ प्रवर्गातील उमेदवारांची स्पष्ठता येत नाही, तो पर्यत पुढील कार्यवाही करणेबाबत अडचणी येत आहेत. जर दिव्यांग व अनाथ वगळुन कार्यवाही केल्यास भविष्यात बिंदुनामावलीनुसार ज्या प्रवर्गातील दिव्यांग किंवा अनाथ उमेदवार उपलब्ध होईल तो बिंदु रिक्त न राहील्यास खुल्या प्रवर्गातील बिंदुवर संबंधित उमेदवारास सामावुन घ्यावे लागेल, जर खुल्या प्रवर्गातील बिंदु उपलब्ध झाला नाही तर काही प्रवर्गाचे बिंदु कमी व जास्त होण्याची शक्यता निर्माण होते, अथवा शासनाने परवानगी दिलेल्या पदांपेक्षा जास्त पदे भरावी लागतील. उपरोक्त कार्यवाही पुर्ण होणेपुर्वी प्रतिक्षायादीतील उमेदवारांना नियुक्ती देणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे वरील सर्वबाबीची तपासणी चालु असुन, लवकरात लवकर प्रतिक्षायादीतील उमेदवारांच्या नियुक्तीबाबत कार्यवाही करणेकरीता समन्वय समिती प्रयत्नशील आहे. **तथापि प्रतिक्षायादी ही १ वर्षाकरीता वैध असलेने उमेदवारांची संधी हुकणार नाही.**

**(मिलिंद ज्यो नाईक)**
अध्यक्ष
समन्वय समिती तथा
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
कोकण प्रदेश, मुंबई